MAHILA VIKAS SANSTHA, WARDHA

# INDRAPRASTHA NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, WARDHA, DIST. WARDHA 442001 (M.S.)

(Affiliated To RTM Nagpur University, Nagpur)

# DEPARTMENT OF MARATHI



# • मराठी विभाग :—

महिला विकास संस्था, वर्धा अंर्तगत इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेजची स्थापना करण्यात आली. तेव्हापासून मराठी विषयाचे अध्यापन महाविद्यालयात सुरू झाले. बी.ए. बरोबरच पुढे महाविद्यालयात मराठी पदव्युत्तर अध्यापन सुरू झाले. अध्ययन व अध्यापनाकरिता आवश्यक असे समृद्ध ग्रंथालय महाविद्यालयात सुरू करण्यात आले. मराठी विभागांतर्गत अनेक विद्यार्थ्यांना त्यांचे उच्च शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले आणि सध्या ते अनेक शासकीय, निमशासकीय क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून गुणवत्ता यादीमध्ये या विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आजपर्यंत स्थान मिळविले आहे. वर्ष २०२१—२२ या सत्रातील **राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर मधील मराठी विभागातून दुसरा मेरिट सागर अरूणराव द्रवलकर तर दहावी मेरिट चारूलता रूपराव पाठे आली आहे. तर २०२२— २३ या सत्रामध्ये अनुप गोपालराव पाठे हा सातवा मेरिट तर हेमलता गुणवतंराव गवळी ही आठवी मेरिट आली आहे.** ही मराठी विभाग तथा महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

- **Faculty profile**

| Sr. No | NAME | DESIGNATION | QALIFICATION | EXPERIENCE (Years) |
|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Vandana Palsapure | Asso. Prof. & Head | M.A. M.Phil. (MAR), Ph.D. | 27 Years |
| 2 | Prof. D. B. Boharupi | Assistant professor | M.A. (MAR., HIS. SOC.), B.ED., M.ED., NET-SET (MAR.), Ph.D. ( Submitted) | 12 Years |
| 3 | Prof. N . M. Debe | Assistant professor | M.A. MARATHI, NET (MAR.) | 10 Years |

## VISION

- To make the student competent to face the global challenges.

## MISSION

- To remove phobia of Marathi and Marathi grammar among the student.
- To seek active participation of the student in all the co-curricular activities.
- To organize academic and co-curricular activities for overall development of the student.
- To prepare student for competitive examination

## FUTURE PLANS

- From the dialectal point of view, the border area of Varadi & Nagpuri dialects is Wardha Taulka , so to implement dialect study project.
- To organize Vidarbha Sahitya Sammelan.
- Preservation & Documentation of Gangasagar & Tumbdi folkart in Wardha Taluka.
- To publish more books in Marathi Language.
- To start information center related with Marathi Sahitya for students.

# अभ्यासक्रम

# COURESES OFFERED

## YEAR OF ESTABLISHMENT

### UNDER GRADUTION & PSOT GRADUATION

| U.G. | MARATHI | 1996 - 1997 |
|---|---|---|
| U.G | MARATHI LITERATURE | 1996 – 1997 |
| P.G. | MARATHI | 2000 - 2001 |

# COURSE OUTCOME & PROGRAMME OUTCOMES:

## PROGRAM OBJECTIVES

### बी.ए. आवश्यक मराठी — विषयाची उद्दिष्टे

१. मराठी भाषेतील प्रमुख अभिजात साहित्याचा व साहित्यिकांचा परिचय घडविणे.

२. मराठी भाषा आणि साहित्य यासंबधीची आवड निर्माण करणे.

३. विद्यार्थ्यांच्या वाङ्मयीन व कलाविषयक अभिरूचीचा विकास करणे.

४. साहित्याभ्यासातून जिवनविषयक व समाजविषयक ज्ञान विकसित करणे, प्रगल्भ करणे.

५. समकालीन स्पर्धेच्या व इंग्रजी भाषेच्या अतिक्रमणाच्या परिस्थितीत मराठी भाषेच्या सरंक्षण व संवर्धनाबरोबरच तिचे शुद्ध व अविष्कृत रूप टिकविण्याच्या दृष्टीने जागृकता निर्माण करणे.

६. भाषा व्यवहारासाठी आवश्यक ती लेखन, भाषण व वाचन कौशल्य ही कौशल्य विकसित करणे.

७. भाषिक कौशल्याचे विविध आविष्कार आणि संपर्क—प्रसार माध्यमे यांचा परस्परसंबंध समाजावून देणे.

८. भाषेचे तसेच साहित्याचे आकलन आणि जीवनव्यवहारात उपयोजन करण्यास प्रवृत्त करणे.

# COURSE OBJECTIVES

## बी.ए. आवश्यक मराठी – अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. मराठी भाषेच्या समृद्धीची जाणीव करून देणे.

२. भाषेच्या व साहित्याच्या अभ्यासाद्वारे भारतीय संस्कृती आणि इतिहासाची ओळख करून देणे.

३. विविध साहित्यप्रकारांची ओळख करून देणे.

४. विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्य विकसित करणे व त्यांना रोजगारभिमुख बनविणे.

५. नैतिक मूल्ये रूजविणे.

# PROGRAM OBJECTIVES

## बी.ए. मराठी साहित्य — विषयाची उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांना मराठी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकारांचा व प्रवृती — प्रवाहांचा काही निवडक प्रातिनिधिक साहित्यकृतींच्या अभ्यासाद्वारा परिचय करून देणे.

२. मराठी साहित्यातील निवडक साहित्यकृतींची व संबंधित वाङ्मयप्रकारांचा आशय व अभिव्यक्तींच्या संदर्भात विस्ताराने ओळख निर्माण करून देणे.

३. मराठी साहित्य व मराठी भाषा याविषयींची प्रगल्भ अभिरूची निर्माण करणे.

४. साहित्याचा आस्वाद घेण्याची व त्याचे स्थूलमानाने मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित करणे.

५. साहित्याच्या अभ्यासातून जीवनविषयक व सामाजविषयक जाण निर्माण करणे.

६. प्राचीन ते अर्वाचीन अशा मराठी वाङ्मयपटाची स्थूलपणे त्यांना ओळख करून देणे.

७. पदव्युत्तर वर्गातील मराठी साहित्याच्या सूक्ष्म व सखोल अभ्यासाची पार्श्वभूमी बी.ए. भाग १ ते ३ च्या तीन वर्षाच्या अभ्यासक्रमातून निर्माण करणे.

८. मराठी भाषिक कौशल्यांच्या व्यावहारिक उपयोजनाची जाण विकसित करणे.

९. मराठी भाषिक कौशल्ये आणि वाङ्मयीन कौशल्ये यांची ओळख करून देणे आणि त्यांचे ज्ञान विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.

१० वाङ्मायासंबंधीच्या विविध मूलभूत संज्ञा — संकल्पनांचा परिचय करून देणे. व त्याविषयीचे आवश्यक मूलभूत जाण निर्माण करणे.

# COURSE OBJECTIVES

## बी.ए. मराठी साहित्य – अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

१. विद्यार्थ्यांना मराठी साहित्यातील विविध वाङ्मयप्रकारांची तोंडओळख होईल आणि मराठी साहित्यविषयक ज्ञानाने ते संपन्न होतील.

२. मराठी साहित्यातील निवडक व महत्त्वपूर्ण साहित्यकृतींचे ज्ञान विद्यार्थ्यांना होईल.

३. मराठी भाषा आणि मराठी साहित्य याविषयीच्या प्रगल्भ अभिरूचीचा विकास त्यांच्यामध्ये होईल.

४. साहित्यकृतींचा आस्वाद घेण्याची आणि त्यांचे स्थूलमानाने मूल्यांकन करण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होईल.

५. मराठी भाषेच्या विविध कौशल्यांची ओळख होऊन त्याविषयीची जाण त्यांच्यामध्ये विकसित होईल.

६. मराठी भाषेतील वाङ्मयीन कौशल्यांचे, तत्रांचे व शैलीवैशिष्ट्यांचे प्राथमिक ज्ञान विद्यार्थ्यांना होईल व त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करण्यास ते सक्षम होतील.

७. मराठी भाषिक कौशल्यांचे व्यावहारिक उपयोजन करण्यास विद्यार्थी सक्षम होतील.

८. मराठी वाङ्मयातील महत्त्वपूर्ण संज्ञा–संकल्पनांचे पायाभूत ज्ञान प्राप्त होऊन त्याआधारे मराठी भाषेच्या प्रत्यक्ष व्यवहारातील वापरास विद्यार्थी सक्षम होतील.

# PROGRAM OBJECTIVES

## एम. ए. मराठी — विषयाची उद्दिष्टे

- मराठी भाषा आणि मराठी साहित्य याविषयीचे प्रगत आणि परिपूर्ण ज्ञान विद्यार्थ्याला व्हावे व त्याविषयीची प्रगल्भ जाणीव विकसित व्हावी.
- मराठी साहित्याच्या परीघातील विविध क्षेत्रात संशोधन करण्याची क्षमता विकसित व्हावी.
- विद्यार्थ्याला स्वत:च्या अभिरूचीचे संशोधन क्षेत्र निश्चित करता यावे.
- वाङ्मयविषयक आणि मानवी जीवनविषयक जाणीव प्रगल्भ व विकसित व्हावी.
- विद्यार्थ्यांमधील लेखनकौशल्याचा पूर्ण विकास होऊन त्यांच्यात संशोधनाची, समीक्षेची, वाङ्मयप्रकारातील प्रत्यक्ष लेखनाची क्षमता व जाणीव निर्माण व्हावी.
- मराठी साहित्य, भारतीय साहित्य आणि विश्वसाहित्य याविषयीची मूलभूत जाण विकसित होऊन संशोधनाच्या नव्या वाटा शोधण्यास विद्यार्थ्यांनी स्वत:उद्युक्त व्हायला हवे.
- उच्च शिक्षणातील आचार्य (पीएच. डी. पदवीसाठी) वा संशोधनकार्यासाठी पूर्ण सिद्धता व्हावी.
- विविध वाङ्मविषयक प्रश्न व सोबतच राष्ट्रीय, सामाजिक व सांस्कृतिक प्रश्न यांच्या परस्परसंबंधांची जाण विकसित होऊन त्यासंबंधी वाङ्मयक्षेत्रात सकारात्मक कार्य करण्याची प्रेरणा निर्माण होणे.
- मराठी भाषा, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांच्या आंतर्सबंधांची प्रगल्भ जाणीव होऊन त्यांच्या विकासाठी आणि समृद्धीसाठी कार्य करण्याची प्रेरणा जागृत व्हावी.
- प्राचीन ते अर्वाचीन अशा मराठी साहित्याच्या समग्र इतिहासाची व त्यातील प्रवृत्ती—प्रवाहांची प्रगल्भ जाण विकसित होऊन, संबंधित दायित्वबोध होऊन त्याविषयी समाजाला उचित, सम्यक व सकारात्मक मार्गदर्शन करण्याची प्रेरणा निर्माण व्हावी.

# COURSE OBJECTIVES

## एम. ए. मराठी साहित्य – अभ्यासक्रमाची उद्दिष्टे

- अभ्यासक्रमाची उद्दिष्टे साध्य होतील.
- भारतीय इतिहास व भारतीय संस्कृतीची जाणीव होईल.
- कौशल्यावर आधारित अभ्यासक्रमाच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.
- व्यक्तिमत्त्वाचा चौफेर विकास होईल.
- विद्यार्थ्यांकडून दर्जेदार व समाजोपयोगी संशोधन कार्य घडून येईल.
- वाङ्मयाच्या अभ्यासामुळे विद्यार्थी वाङ्मय निर्मिती करण्यास प्रवृत्त होईल.
- आकलन झालेल्या ज्ञानाचे जीवनव्यवहारात उपयोजन करेल.

# M.A. – I & II (MARATHI)

## FACULTY OF HUMANITIES

## M.A.: Part - I (Marathi) - I Sem.

| M.A. - I (Semester I) (Compulsory) | Marks | |
|---|---|---|
| | TH | IA |
| १. प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास | 80 | 20 |
| २. साहित्यशास्त्र | 80 | 20 |
| ३. नाटक ( विशेष वाङ्मयप्रकार) | 80 | 20 |
| ४. संत ज्ञानेश्वर ( विशेष ग्रंथकार) | 80 | 20 |
| ५. कौशल्य | 100 | |

## M.A.: Part - I (Marathi) - II Sem.

| M.A. - I (Semester II) (Compulsory) | Marks | |
|---|---|---|
| | TH | IA |
| १. आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास | 80 | 20 |
| २. आधुनिक मराठी कविता | 80 | 20 |
| ३. वैचारिक मराठी साहित्य | 80 | 20 |
| ४. संशोधनशास्त्र | 80 | 20 |
| ५. कौशल्य | 100 | |

# M.A. – I & II (MARATHI)

## FACULTY OF HUMANITIES

## M.A.: Part - II (Marathi) - III Sem.

| M.A. - II (Semester III) (Compulsory) | Marks | |
|---|---|---|
| | TH | IA |
| १. प्राचीन व मध्ययुगीन कविता | 80 | 20 |
| २. मराठी भाषा, बोली आणि व्याकरण | 80 | 20 |
| ३. ग्रामीण साहित्य | 80 | 20 |
| ४. उपयोजित मराठी आणि कौशल्ये | 80 | 20 |
| ५. कौशल्य | 100 | |

## M.A.: Part - II (Marathi) - IV Sem.

| M.A. - II (Semester IV) (Compulsory) | Marks | |
|---|---|---|
| | TH | IA |
| १. मध्ययुगीन — आधुनिक गद्य | 80 | 20 |
| २. भाषाविज्ञान | 80 | 20 |
| ३. लोकसाहित्य | 80 | 20 |
| ४. साहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक अभ्यास | 80 | 20 |
| ५. कौशल्य | 100 | |

INDRAPRASTHA NEW ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE
INACSC
WARDHA